# 'मटा'तर्फे आज मोफत नेचर वॉक

## विद्यापीठातील बॉटॅनिकल गार्डनला भेट देण्याची संधी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र (बॉटनी) विभागाने विकसित केलेल्या दुर्मिळ आणि औषधी वनस्पतीच्या बॉटॅनिकल गार्डन येथे महाराष्ट्र टाइम्सच्यावतीने सोमवारी (ता. १३) सकाळी अकरा वाजता 'वॉक थ्रू लिड बॉटॅनिकल गार्डन' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. 'मटा' चे वाचक, बॉटनीचे विद्यार्थी, युवक आणि विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होऊ शकतात.

वनस्पती विभागाने ४२ एकरमध्ये दुर्मिळ वनस्पती रुजवून विकसित केल्या आहेत. त्यामध्ये सेक्शन प्लँट, फॅमिली मेंबर, हर्बेरियम या विभागात ४० हजार वनस्पतींच्या पेर्शीचे संवर्धन केले आहे. तसेच काही वनस्पतींसाठी वेगवेगळे प्लॉटस् तयार केले आहेत. नेचे वर्गीय वनस्पतीतील ७८१ तर बुरशी विभागात ५८० जातीच्या वनस्पती आहेत. सपुष्प वनस्पती गटात ८५० प्रकारची झाडे आणि रोपे लावण्यात आली आहेत. आर्किड फुलांची नर्सरी तयार करण्यात आली असून ९० प्रकारांच्या फुलाची रोपे पहायला मिळणार आहेत. तसेच फुलांच्या १८० जातींची झाडे आहेत.

भारतातील सर्व जातींचे पाम एकाच ठिकाणी पहायला मिळणार आहेत. अंदमान निकोबारसह 'सेंच्युरी पाम' या जातीसह ५५ प्रकारची पामची झाडे विकसित करण्यात आली आहेत. त्सुनामीमुळे खारफुटी वनस्पतीला महत्व असून २७ प्रकारच्या वनस्पती तयार करण्यात आल्या आहेत. तसेच गवताचे २० प्रकार पहायला मिळतील. व्हिक्टोरिया लिली हे झाडही पहायला मिळणार आहे.

वनस्पती विभागाने १२ एकर आणि भाषा भवन येथे २० एकरवर उद्याने विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे. विभाग प्रमुख वर्षा जाधव (राठोड) यांच्या नेतृत्वाखाली प्रोफेसर एस. आर. यादव, निरंजना चव्हाण, प्रो. एस. एस. कांबळे, डी. के. गायकवाड, एन.बी. गायकवाड, प्रो. एस. जी. घोणे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एम. एम. लेखक, डॉ. कल्याणी पवार, डॉ. एम. एस. निंबाळकर यांच्यावतीने नेचर वॉकमध्ये माहिती दिली जाणार आहे. नेचर वॉकमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी सतीश घाटगे (८५५२९६९१९१), अदित्य सरनाईक (९७६७८९०६२६) यांच्याशी संपर्क साधावा.

# ‘तरुणांनी सत्याच्या बाजूने राहावे’

कोल्हापूर टाइम्स टीम

‘तरुणांनी चळवळीत सहभागी होणे ही काळाची गरज बनली आहे. आपण सत्तेच्या बाजूनी नव्हे तर सत्याच्या बाजूंनी उभे राहिले पाहिजे. वर्तमानाला सत्याच्या कसोटीवर तपासून पाहण्याची क्षमता हवी,’ असे मत हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वैभव नायकवडी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ‘राज्यशास्त्रातील समकालीन समस्या’ या चर्चासत्राच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. यानिमित्ताने, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३७ वे संयुक्त अधिवेशन घेण्यात आले. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे चर्चासत्र झाले.

नायकवडी म्हणाले, ‘आज राज्यासमोर व राष्ट्रासमोर अनेक समस्या उभ्या ठाकल्या आहेत. त्या घटना नागरिकांशी निगडीत आहेत. त्या प्रश्नांचा नागरिकांवर होणाऱ्या परिणामांचा वर्तमान राजकारणांशी जवळचा संबंध आहे. यामुळे वर्तमानाला सत्याच्या बाजूने तपासून पाहिले पाहिजे.’



शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित चर्चासत्रात बोलताना वैभव नायकवडी, सोबत डॉ. विलास आवारी, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भालबा विभूते, डॉ. रवींद्र भणगे आदी.

## ३८ व्या संमेलनाध्यक्षपदी डॉ. रवींद्र भणगे

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३८ वे अधिवेशन जवाहरलाल नेहरू कॉलेज औरंगाबाद येथे होणार आहे. या अधिवेशनाच्या संमेलनाध्यक्षपदी शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांची निवड करण्यात आली.

परिषदेच्या समारोपाला ज्येष्ठ राजकीय अभ्यासक डॉ. अशोक चौसाळकर, प्रा बी. बी. पाटील, डॉ. भालबा विभूते, प्राचार्य प्रमोद पवार, डॉ. विलास आवारी, प्राचार्य मनोहर पाटील, प्राचार्य पी. डी. देवरे, डॉ. भारती पाटील आदी व्यासपीठावर होत्या. प्राचार्य डॉ. सिकंदर जमादार यांनी प्रास्ताविक केले. विभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

# सफर बोटॅनिकल गार्डनची ...

ज्योत्स्ना भाटवडेकर

**महाराष्ट्र टाइम्सच्या वतीने आज, सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या बॉटनी विभागाने उभारलेल्या बोटॅनिकल गार्डन येथे हेरिटेज व नेचर वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वसामान्य नागरिक, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना हे गार्डन पाहण्याची संधी यानिमित्ताने उपलब्ध होत आहे.**



वनस्पती हा माणसाच्या जीवनातील अविभाज्य घटक असून अनेकवेळा वनस्पतींमध्ये असणारे गुणधर्म, त्यांच्या विविध प्रजाती, त्यांच्याकडून अप्रत्यक्षपणे आपल्याला होणारे फायदे याबद्दल आपण अनभिज्ञ असतो. त्याचबरोबर विकासाच्या नावाखाली होणाऱ्या वृक्षतोडीमुळे, निसर्गातील साधनसंपत्तीच्या अतिवापरामुळे वनस्पतींचे संवर्धन हा महत्वाचा प्रश्न बनला आहे. अशा परिस्थितीत दुर्मिळ आणि वैविध्यपूर्ण अशा वनस्पतींचा संग्रह, अभ्यास आणि जतन-संवर्धन या हेतून शिवाजी विद्यापीठात लीड बोटॅनिकल गार्डनची निर्मिती केली आहे. या गार्डनमध्ये अनेक वैशिष्ट्यपूर्ण वनस्पतींतील विविध प्रजातींची लागवड करण्यात आली आहे.

प्रजातींच्या वैविध्यतेसाठी ओळखण्यात येणाऱ्या विद्यापीठाच्या या गार्डनमध्ये १२०० हून अधिक वनस्पतीच्या प्रजाती आहेत. भारतातील पश्चिम घाटामध्ये सापडणाऱ्या प्रजातींच्या एक तृतीयांश प्रजाती आपणास येथे पहावयास मिळतात. पामच्या प्रजातींसाठी हे गार्डन विशेष ओळखले जाते. येथे पामच्या ११० प्रजाती उपलब्ध असून इतक्या मोठ्या प्रमाणावर पामच्या प्रजातीतील विविधता देशातील काहीच गार्डन्समध्ये दिसून येते. यामध्ये सेंचुरी पाम, फॉक्स टेल पाम, ट्रायएंगल पाम ह्याबरोबरच इतर अनेक वैविध्यपूर्ण प्रजाती उपलब्ध आहेत. त्यातील सेंचुरी पामचे आयुष्य शंभर वर्षे इतके असून, त्याच्या संपूर्ण आयुष्यात ते एकदाच फुला-फळांनी बहरते आणि त्यानंतर मरून जाते. जगात सर्वाधिक फुलोरा आणि पुष्पविन्यास असणारे वृक्ष म्हणून सेंचुरी पाम ओळखले जाते. जगातील फांद्या असणाऱ्या एकमेव पामची प्रजातीही या गार्डनचे विशेष आहे.

व्हिक्टोरिया ॲमेझॉनिका ही वनस्पती ह्या गार्डनमधील आकर्षणाचा विषय आहे. ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातून आणलेल्या ह्या वनस्पतीचं पान काहीलीसारखं असून, आश्चर्याची बाब म्हणजे साधारण २० – २५ किलोपर्यंतच्या मुलाचं वजन पेलण्याइतकं ते मजबूत आहे. याच्या

**पृथ्वी रक्षण**

जोडीला भारताच्या पश्चिम घाटातील दुर्मिळ आणि लोप पावत चाललेल्या शंभर एक प्रजातींची लागवड जतन-संवर्धनाच्या हेतूने या गार्डनमध्ये केली आहे. भारतात पहिल्यांदाच अशाप्रकारचा प्रकल्प हाती घेऊन वनस्पतींचा संग्रह झाल्याचे सांगण्यात येते. दुर्मिळ प्रदेशनिष्ठ वनस्पतींच्या बिया मिळवून त्यापासुन नवीन रोपे उपलब्ध करून देत खऱ्या अर्थाने वनस्पती संवर्धनाचे काम वनस्पतीशास्त्र विभाग करत आहे ह्यात काही शंका नाही. आपल्याला होणाऱ्या साध्या सर्दी-पडश्यापासुन ते न्युमोनिया आणि कॅन्सरसारख्या मोठ्या आजारावर उपाय म्हणून वापरण्यात येणाऱ्या ५० हून अधिक औषधी वनस्पतींचा संग्रह येथे पहावयास मिळतो. याचबरोबर स्वयंपाकात चव आणणाऱ्या अनेक मसाल्यांच्या झाडांचीही ओळख आपल्याशी येथे होते.

फुलझाडे हा आपणा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय असून इतर नर्सरीमध्ये उपलब्ध असणाऱ्या फुलझाडापेक्षा वेगळी फुलझाडे येथे बघावयास मिळतात. यामध्ये कंदील पुष्प, ऑर्कीड आणि लिलीच्या वर्गात असणारया फुलझाडांचा समावेश आहे. ही फुले त्यांच्या विशिष्ट मौसमानुसार बहरतात. तर काटे कोरांटी ह्या देशी वनस्पतीच्या संपूर्ण भारतात आढळणाऱ्या ३० प्रजातींपैकी २२पेक्षा अधिक प्रजाती ह्या गार्डनमध्ये आहेत.

> माणसाचा श्वासोच्छवास, आरोग्य आणि त्याचे पोट या सर्व गोष्टी वनस्पतींमुळे सुरु आहेत. थोडक्यात, माणसाचे संपूर्ण अस्तित्वचं वनस्पतींवर निर्भर आहे. याहून वनस्पतींचा मोठा उपयोग काय सांगता येईल? अनेक वनस्पती अप्रत्यक्षपणे आपल्याला काही देत असतात. मला वस्तुरूपाने ह्या वनस्पतीकडून काय मिळाले हा विचार न करता मानवाने त्यांचे संवर्धन केले पाहिजे.
>
> – प्रा. एस. आर. यादव

# दिव्यांगांसाठी कार्यशाळा

कोल्हापूर : 'विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देऊन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध कौशल्यपूर्ण रोजगाराभिमुख अभ्यासक्रम निर्माण करण्याची अत्यंत निकड आहे', असे प्रतिपादन गोवा येथील सामाजिक कल्याण संचालनालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. ताहा हाजिक यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व समावेशी शिक्षण संसाधन केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'डेव्हलपमेंट ऑफ ॲक्सेसिबल लायब्ररी फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज' या विषयावर विद्यापीठ, महाविद्यालयीन, सार्वजनिक ग्रंथपाल यांच्यासाठी राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यावेळी डॉ. हाजिक बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

# मोबाईल बँकिंग, डीजी लॉकरबाबत दक्षता घेण्याची गरज : डॉ. नांदवडेकर

## शिवाजी विद्यापीठात डिजिटल साक्षरता कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डीजी लॉकर, मोबाईल बँकिंग यांच्या वापराबाबत प्रत्येकाने दक्षता घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ बँक ऑफ इंडिया अध्यासन, राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक संघ व महिला आयोग मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने विद्यापीठात महिलांकरिता 'डिजीटल लिटरसी' कार्यशाळा झाली. बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर नितीन देशपांडे यांनी डिजिटल लिटरसी ही वित्तीय साक्षरतेबरोबर महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित डिजिटल साक्षरता कार्यशाळाप्रसंगी डॉ. विजय ककडे, प्रा. डॉ. मानसिंग जगताप आदी.**

कार्यशाळेसाठी संगणक विभाग प्रमुख स्वाती खराडे, संध्या देशपांडे, आनंदा शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विविध क्षेत्रांतील २०० महिलांनी सहभाग घेतला. कॉमर्स विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. शाहू ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्रीकांत आडिवरेकर यांनी प्रास्ताविक केले.

बँक ऑफ इंडियाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, सुरेश मिरजकर यांनी आभार मानले.

# आविष्कार स्पर्धेत प्रा. सुनील भोसले यांचे संशोधन प्रथम

**कासारवाडी : वार्ताहर**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे झालेल्या १४ व्या आविष्कार संशोधन स्पर्धेत प्रा. सुनील भोसले (डी. के.ए.एस.सी.कॉलेज, इचलकरंजी) यांच्या 'जलयुक्त शिवार अभियान' या संशोधन प्रकल्पास प्राध्यापक गटातून सलग चौथ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावला.

मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी 'जलयुक्त शिवार अभियान' या संशोधन प्रकल्पाची निवड झाली आहे. सदर संशोधन प्रकल्पामध्ये शाहूवाडी तालुक्यातील पिशवी खोऱ्यातील सोनवडे, परखंदळे, शित्तूर तर्फ मलकापूर व पिशवी या चार गावांमध्ये महाराष्ट्र शासन मार्फत राबवण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेचा भौगोलिक दृष्टिकोनातून सूक्ष्म अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधन प्रकल्पास विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. शुभांगी गावडे, कार्याध्यक्ष अभयकुमार सांळुखे, प्राचार्य आर. आर. कुंभार, आविष्कार समन्वयक सौ. पी. एस. तपासे, डॉ. पी. बी. अचोले, डॉ. डी. सी. कांबळे व हितेंद्र सांळुखे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सत्तेच्या नव्हे तर सत्याचा बाजूने तरुणांनी उभे राहावे : वैभव नायकवडी

## राज्यशास्त्र परिषद; अधिवेशन समारोप



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अधिवेशनच्या समारोप कार्यक्रमात बोलताना वैभव नायकवडी. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. भालबा विभुते आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तरुणांनी चळवळीत सहभाग घेणे काळाची गरज बनली असून सत्य बोलण्याची गरज आहे. आपण सत्तेच्या नव्हे तर सत्याच्या बाजूने उभे राहिले पाहिजे, असे प्रतिपादन हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वैभव नायकवडी यांनी केले.

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद व अधिवेशनाचा समारोप समारंभ शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहात झाला. यावेळी ते बोलत होते. नायकवडी म्हणाले, राज्य व राष्ट्रासमोर आज अनेक समस्या आहेत. या समस्यांचा प्रत्येक भारतीय नागरिकांवर होणार परिणाम याचा वर्तमान राजकारणाशी जवळचा संबंध आहे. विद्यार्थी चळवळीची सुरुवात राज्यशास्त्र विभागातून झाली. राज्यशास्त्राचा अभ्यासक कायमच विद्यार्थी असतो. वर्तमानाला सत्याच्या कसोटीवर तपासून पाहिले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सिकंदर जमादार यांनी केले. आभार विभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी मानले. याप्रसंगी डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. बी. बी. पाटील, डॉ. भालबा विभुते, प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे, डॉ. भारती पाटील उपस्थित होते.

### संमेलनाध्यक्षपदी डॉ. रवींद्र भणगे यांची निवड

३८ वे महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अधिवेशन जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद येथे होणार आहे. या अधिवेशनाच्या संमेलनाध्यक्षपदी शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांची निवड करण्यात आली आहे.